महासागर



# कर्नल सुधीर सावंत यांचा स्वातंत्र्य कोकण अभियानाला जाहीर पाठिंबा



**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

कोकणचे नेते मा. आमदार, खासदार कर्नल सुधीर सांवत साहेब यांची आज भेट घेऊन स्वतंत्र कोकणराज्य विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. माननीय कर्नल सुधीर सांवत. यांनी स्वतंत्र कोकणराज्य अभियानाला जाहीर पाठिंबा देऊन त्यांची सल्लागार पदांसाठी निवड करण्यात आली. या बैठकीला संजय कोकरे अध्यक्ष/संस्थापक. धनंजय कुवसेकर, मुंबई अध्यक्ष, विभागीय नेते मुरलीधर करंगुटकर, सुभाष राणे, राजेंद्र सुर्वे, विजय पवार उपस्थित होते. कर्नल सुधीर सावंत यांची सल्लागार पदी निवड झाल्याबद्दल समिती तर्फे अभिनंदन करण्यात आले.

# कोविडचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सज्ज राहावे

## पालकमंत्री गणेश नाईक यांचे निर्देश

**पालघर, दि. ४ प्रतिनिधी**

राज्यामध्ये कोव्हिड रुग्णांची संख्या वाढत असून पालघर जिल्ह्यामध्ये देखील काही रुग्ण आढळले आहेत. याआपत्तीशी सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सज्ज रहावे, असे निर्देश वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले.अवकाळी पावसामुळे नुकसानीचा आढावा. तसेच संभाव्य आपत्तीचा आढावा पालकमंत्री गणेश नाईक यांनी जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय येथे घेतला.





यावेळी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल , खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित , जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक श्री . देशमुख , अतिरिक्त जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, जव्हार आणि डहाणूचे प्रकल्प अधिकारी अपूर्वा बासुर , विशाल खत्री ,निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी विजय जाधव , तेजस चव्हाण मान्यवर उपस्थित होते.

कोविडचा प्रसार रोखण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी निर्जंतुकीकरण करून घ्यावे. उपहारगृहामध्ये स्वच्छता ठेवून निर्जंतुकीकरण करावे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कोविड सेंटर सुरू करावे. शाळा तसेच महाविद्यालयामध्ये उन्हाळी सुट्टी लवकरच संपणार आहेत. या सुट्ट्या संपण्याअगोदर शाळा महाविद्यालयामध्ये साफसफाई करावी. कोविडचा प्रसार रोखण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व अत्यावश्यक सुविधा सुरू कराव्यात. नागरिकांनी आपली सामाजिक जबाबदारी लक्षात घेता नियमित हात स्वच्छ धुवावे तसेच निर्जंतूक करावे, असे आवाहन पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले.

शेतकरी बांधवांनी बोगस बी – बियाणे खरेदी करू नये बोगस बी-बियाणे विक्री करणाऱ्या दुकानावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. शेतकरी बांधवांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या बी- बियाणे व खते कमी पडणार नाहीत पिक विमा मिळणे हा प्रत्येक शेतकऱ्याचा हक्क असून यामध्ये कोणी गैरप्रकार करताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाचे कुपोषणमुक्त पालघर जिल्हा हे ध्येय असून हे ध्येय साध्य करण्यासाठी जिल्ह्यातील कुपोषित बालकांना सशक्त आणि आरोग्य संपन्न करण्यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. पाणी मिळणे हा सर्व नागरिकांचा मूलभूत हक्क असून प्रत्येक घरामध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे. अवकाळी पावसामुळे घरे शेती बोटी मत्स्य उत्पादन इत्यादी बाबीचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचा पंचनामा पूर्ण झाला असून निधी मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे निधीची उपलब्धता होताच नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई चे वाटप करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले.

दिवसेंदिवस वातावरणातील तापमान वाढत आहे. हे तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी तसेच वातावरणातील कार्बन डाय-ऑक्साइड कमी करण्यासाठी ऑक्सिजन निर्मिती करणाऱ्या बांबूची लागवड करणे आवश्यक असल्याचे राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्वत विकास फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितले पालघर जिल्ह्यातील बांबू लागवडीचा आढावा पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय येथे घेण्यात आला. जिल्ह्यामध्ये 10 हजार हेक्टर क्षेत्रामध्ये बांबू लागवड करण्याचे उद्दिष्ट असून 2 हजार 500 हेक्टरवर बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये एक किलो दगडी कोळसा वापरून जेवढी वीज निर्माण केली जाते. तेवढीच वीज एक किलो बांबू वापरून मिळते. कोळसा जळल्यामुळे प्रदूषणात वाढ होते पण बांबू पासून प्रदूषण होत नाही. त्यामुळे औष्णिक विद्युत प्रकल्पात दगडी कोळशाचा वापर न करता बांबूचा वापर करावा, असे आवाहन पाशा पटेल यांनी केले.

# भिवंडीत स्व.इंदिरा गांधी रूग्णालयात नवजात बाळांच्या काळजीसाठी प्रशिक्षण संपन्न



**भिवंडी दि. ४ प्रतिनिधी**

भिवंडीतील स्व.इंदिरा गांधी स्मृती शासकीय उपजिल्हा रुग्णालयात नवजात बाळांच्या काळजीसाठी महिलांसाठी कर्नाटक येथील हेल्थ प्रमोशन ट्रस्ट च्या माध्यमातून कंगारू मदर केअरच्या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रुग्णालयाच्या अधीक्षका डॉ माधवी पंदारे,कर्नाटक येथील हेल्थ प्रमोशन ट्रस्टच्या डॉ. सारिका कंग्राळकर व श्रद्धा गुरव, प्रोजेक्ट अधिकारी जय मोरे, शासकीय इंदिरा गांधी रुग्णालयाचे डॉ.इजहार अन्सारी,सहाय्यक अधिसेविका हेमलता जाधव यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचा लाभ रुग्णालयातील परिचारिका, महिला सहभागी झाल्या होत्या. कंगारू मदर केअरच्या माध्यमातून नवजात कमी वजनाचे शिशुंना त्यांच्या आईच्या अंगावर ठेवून शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारले जाते तसेच त्यांचे वजन वाढून सुदृढ होतात. शिशुंच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल, त्यामुळे भिवंडी मधील सर्व सामान्य नागरिकांना त्यांच्या नवजात शिशूना कांगारु मदर केअर पद्धतीचा खूप फायदा होणार आहे असा विश्वास व्यक्त केला.या प्रशिक्षणा मध्ये वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. कांगारू मदर केअर प्रशिक्षणा द्वारे भिवंडी रुग्णालयातील वैद्यकीय कर्मचारी नवजात शिशुंच्या काळजी घेण्यासाठी साठी सज्ज झाले आहेत.

# कॉंक्रीटीकरणाचे काम करताना शॉक लागून कामगाराचा मृत्यू

**वसई, दि. ४ प्रतिनिधी**

वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील पेल्हार विभागातील चांदीप गावात रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू असताना विजेचा धक्का लागून एका कामगाराचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. बळवंत प्रसादकुमार ( वय ४३ रा. कोपरी विरार) असे मृत व्यक्तीचे नाव असून, तो रस्त्याच्या कामासाठी सळई कापत असताना त्याला विजेचा धक्का लागल्याने मृत्यू झाला आहे.

ही घटना घडण्याच्या चार दिवसांपूर्वी रोहित्राची दुरुस्ती करताना जयेश घरत या तरुणाचा मृत्यू झाला होता. त्यामुळे विजेचा धक्का लागून मृत्यूची ही दुसरी घटना आहे. महापालिकेच्या माध्यमातून चांदीप नाका ते चांदीप गावापर्यंत कॉंक्रीटीकरण रस्त्याचे काम सुरू होते. त्यावेळी बळवंत सळई कापण्याचे काम करत होते आणि यासाठी लागणारा विद्युत प्रवाह हा जनरेटरवर घेण्यात आला होता. पाऊस पडल्यामुळे काम करण्याची जागा ओली झाल्याने आणि सळई कापण्याच्या यंत्राची वायर तुटलेली असल्याने बळवंतचा वायरला हात लागताच, त्याला जबरदस्त विजेचा धक्का बसला.

तत्काळ त्याला उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले असता, डॉक्टरांनी बळवंतला मृत घोषित केले. काम करत असताना या कामगाराच्या पायात चप्पलही नसल्याचे प्रत्यक्षदर्शी यांनी सांगितले. त्यामुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न उभा राहिला आहे.

# आदिवासी विद्यार्थी वसतिगृहांची संख्या आणि क्षमता वाढवा

## खासदार डॉ. हेमंत सवरा यांची मागणी

**पालघर, दि. ४ प्रतिनिधी**

पालघर जिल्हा हा प्रामुख्याने आदिवासी लोकवस्तीचा असून, विशेषतः डहाणू व तलासरी तालुक्यांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. मात्र, जिल्ह्यातील वसतिगृहांची क्षमता अत्यंत मर्यादित असल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक वेळा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दूर अंतरावर जावे लागते किंवा शिक्षण अर्धवट सोडावे लागते. त्यासाठी आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांसह क्षमता वाढवावी, अशी मागणी खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी आदिवासी विकासमंत्री अशोक ऊईके यांच्याकडे केली आहे.



पालघर हे जिल्ह्याचे ठिकाण असून तेथील वसतिगृहांची क्षमता ही अत्यंत अपुरी असून, त्यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत असतानाही आवश्यक त्यासुविधा उपलब्ध नाहीत. त्यासाठी जिल्ह्यात नव्याने वसतिगृहांची उभारणी करावी व सध्याच्या वसतिगृहांची क्षमता किमान २०० विद्यार्थ्यांपर्यंत वाढल्याने तात्पुरत्या स्वरुपात वसतिगृहची व्यवस्था करून त्यास परवानगी द्यावी, अशी खासदार सवरा यांची मागणी आहे. ही गरज ओळखून आदिवासी विकास विभागाने तातडीने पावले उचलल्यास, शिक्षणासाठी झगडणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना आधार मिळेल आणि त्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल होईल, असा विश्वास खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी व्यक्त केला आहे.

# जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक

**वसई, दि. ४ प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्यांवर नायगाव पोलिसांनी कारवाई केली आहे. यावेळी सहा म्हशींची सुटका करण्यात आली आहे. नायगाव पोलिसांच्या पथकाने पहाटे तीनच्या सुमारास एका संशयास्पद आयशर टेम्पोची तपासणी केली असता त्यात सहा म्हशी आढळून आल्या. तपासात म्हशींची कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याचे निर्देशनास आले. नायगाव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून चालक इसाक कय्युम दावुआ (रा. रवियाना, ता. सरस्वती, जि. पाटण, गुजरात) आणि क्लिनर मोहम्मद यादोघांना अटक केली आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचारप्रकरणी गुन्हा

**वसई, दि. ४ प्रतिनिधी**

एका अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळयात ओढून लग्नाचे आमिष दाखवून तरुणाने तिच्याशी अनेकदा शारिरिक संबंध ठेवले. पिडीत मुलगी गरोदर राहिल्यानंतर हा प्रकार उजेडात आला. मात्र, पिडीतेचे सात महिन्याचे मूल हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु असतानाच पोटात मयत झाले. याप्रकरणी पिडीतेच्या तक्रारीवरून पेल्हार पोलिसांनी बलात्कारासह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून विशाल गिरी (२३) याला अटक केली आहे.

# हुंड्यासाठी विवाहितेचा छळ एकाच दिवशी तीन गुन्हे

**वसई, दि. ४ प्रतिनिधी**

मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात हुंड्यासाठी विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी तीन गुन्हे दाखल झाले आहेत. मीरारोड येथे राहणाऱ्या मनीषा कनोजिया यामहिलेने हुंडयासाठी २०१८ सालापासून सासरच्या लोकांकडून छळ केला जात असल्याची तक्रार दिल्यावरून नयानगर पोलिसांनी पतीन गोविंदा कनोजिया, सासू बिंदु कनोजिया आणिससारे शिवप्रकाश कनोजिया यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दुसऱ्या घटनेत नालासोपारा य़ेथे राहणाऱ्या स्वाती पाठक हिने हुंडयासाठी छळ केला जात असल्याची फिर्याद दिल्यानंतर आचोळे पोलिसांनी पतीन अमन पाठक, सासरा देवेंद्र पाठक, सासू सोनी पाठक आणि नणंद रिध्दीमा पाठक यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तिसऱ्या घटनेत नालासोपारा येथे राहणाऱ्या दिप्ती जोशी हिचा २०१९ पासून हुंड्यासाठी पतीकडून छळ केला जात होता. याप्रकरणी दिप्ती जोशीच्या तक्रारीवरून आचोळे पोलिसांनी पती हिमांशु जोशीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# ३५ लाखांचा गंडा

**भाईंदर , दि. ४ प्रतिनिधी**

शेअर खरेदी केल्यास जादा परताव्याचे आमिष दाखवून ३५ लाख ६३ हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार मरा रोड येथे उजेडात आला आहे. शितलनगर येथे राहणाऱ्या देवी छेत्तीयार यांना दोन महिलांनी मोबाईलवरून संपर्क साधून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परतावा मिळवून देऊ, अशी बतावणी केली होती. त्यावर विश्वास ठेऊन देवी छेत्तीयार यांनी आपल्या बँक खात्यातून एका महिन्यात ३५ लाख ६३ हजार रुपये पाठवून दिले. मात्र, त्यानंतर फसवणुक झाल्याचे लक्षात आलेल्या छेत्तीयार यांनी नयानगर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर पोलिसांनी अनिता मेहता आणि आराध्या शर्मा यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# जीएसटीचा गैरवापर करून २ कोटी ८९ लाखांची फसवणूक

**भाईंदर , दि. ४ प्रतिनिधी**

तक्रारदारांच्या कंपनीचा जीएसटी क्रमांकाचा वापर करून बँकेत खाते उघडून त्याद्वारे २ कोटी ८९ लाख १५ हजार रुपयांचा जीएसटी कर चुकवल्याप्रकरणी अभिषेक सुधीर मेहताविरोधात नवघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक मेहताने जीएसटी कर चुकवण्यासाठी भाईंदर येथे राहणाऱ्या कौशिक तिवारी यांच्या कंपनीचा जीएसटी क्रमांकाचा वापर करून एनकेजीएस बँकेत बनावट खाते उघडले होते. त्याआधारे व्यवसाय करून त्याने तब्बल २ कोटी ८९ लाख १५ हजार रुपयांचा कर चुकवला होता. याची माहिती मिळताच कौशिक तिवारी यांनी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यावर पोलिसांनी अभिषेक मेहताविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# धोकादायक इमारतींची तांत्रिक सल्लागार समितीकडून पाहणी

**भाईंदर , दि. ४ प्रतिनिधी**

मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार मीरा भाईंदर महापालिकेने जुन्या व धोकादायक इमारत घोषित करण्यासाठी आयुक्तांच्या नेतृत्वाकालील तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना केली असून यासमितीने शहरातील इमारतींची पाहणी करण्यास सुरुवात केली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जुन्या व धोकादायक इमारत घोषित करण्याकरता निर्णय घेण्यास अडचण निर्माण झाल्यास अशा प्रकरणात निर्णय घेण्यासाठी उच्च न्यायालय रीट याचिका क्रमांक ११३५/२०१४ मधील निर्णयानुसार संदर्भिय आदेशान्वये अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील 10 जुन्या व धोकादायक इमारतीच्या बाबतीत दोन बांधकाम अभियंत्यांकडून दोन भिन्न संरचनात्मक अहवाल प्राप्त झाला असून सदरचे प्रकरण तांत्रिक सल्लागार समितीकडे सोपवण्यात आले आहे. या जुन्या व धोकादायक इमारतीची स्थळ पाहणी आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.



श्री आशीर्वाद को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेड( डिमेलो हॉटेल, स्टेशन भाईंदर (पश्चिम,), न्यू पल्लवी को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी (६० फूट रोड भाईंदर पश्चिम), जोसेफ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (६० फूट रोड भाईंदर पश्चिम), मालिका को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (६० फूट रोड भाईंदर पश्चिम), न्यू गिरनार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (६० फूट रोड भाईंदर पश्चिम), लक्ष्मी दिप को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड (सिनेमॅक्स जवळ, कनकिया रोड, मिरा रोड (पूर्व), लक्ष्मी आशिष को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (लक्ष्मी पार्क, कनकिया रोड मिरा रोड (पूर्व), बैतूल अब्बास को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (हैदरी चौक नयानगर मिरारोड (पूर्व), फातिमा मंजिल को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमिरा निर्सिंग होम गल्ली, नयानगर, मिरारोड (पूर्व) , शितल प्लाझा (शितल नगर, मिरारोड, पूर्व) याइमारतींची आयुक्तांनी पाहणी केली.

स्थळ पाहणी दरम्यान आयुक्त शर्मा यांनी संबंधित इमारतीचे भोगवटाधारक यांच्याशी संबंधित विषयावर चर्चा करून त्यांचे मत जाणून घेतले. तसेच तांत्रिक सल्लागार समितीचे अधिकारी आणि महापालिका अभियंता यांना सदर जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे अहवाल तातडीने सादर करण्याबाबत सूचना केल्या. महापालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागामार्फत, जुन्या व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा, अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत तांत्रिक सल्लागार समितीमधील अधिकारी उपस्थित होते.

# पर्यावरणदिनी आदिवासी पाड्यावरून जगाला संदेश

**पालघर, दि. ४ प्रतिनिधी**

वातावरण बदलाच्या संकटाला सामोरे जाताना हरित महाराष्ट्राची संकल्पना पूर्णत्वाला नेण्यासाठी दुर्गम पालघर जिल्ह्यातील धानिवरी याआदिवासी पाड्यावर बांबू लागवड करून संपूर्ण विश्वाला संदेश देण्याचा अभिनव कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 5 जून रोजी जागतिक पर्यावरण दिन आहे. त्यादिवशी राज्याचे सहकार पणन वस्त्रोद्योग विभागाचे सचिव प्रवीण दराडे, जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखड , मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित विकास कृती दलाचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल , श्रमजीवी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विवेक पंडित उपस्थित राहणार आहेत'.

मागील दोन महिन्यापासून संपूर्ण पालघर जिल्हा बांबूमय झाला आहे. पालघर जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यामध्ये पाशा पटेल आणि श्रमजीवी संघटना आणि जिल्हा प्रशासनाने जनजागृती मिळावे आयोजित करून शेतकरी वर्गाला जागृत केले आहे. जवळपास अडीच हजार शेतकऱ्यांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेतून बांबू लागवडीसाठी अर्ज दाखल केले आहेत. आदिवासी शेतकऱ्यांना मिळालेल्या वनपट्ट्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात बांबू लागवड केली जाणार आहे, अशी माहिती पाशा पटेल यांनी दिली.

पालघर जिल्ह्यामध्ये नागरी ग्रामीण आणि डोंगरी अशी विषम सामाजिक भौगोलिक परिस्थिती आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून वैयक्तिक सार्वजनिक आणि सामूहिक लाभाच्या योजना राबवून खऱ्या अर्थाने या भागातील शेतकऱ्यांच्या आयुष्यामध्ये बदल घडवण्याचा आमचा मानस आहे, असे उपजिल्हाधिकारी विजया जाधव म्हणाल्या.

पालघर जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांमध्ये झंझावती बांबू मिशन मिळावे पार पडल्यानंतर दोन जून रोजी वनमंत्री तथा पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. त्यानंतर 50 लाख बांबू वृक्ष लागवडीचा शुभारंभ आदिवासी पाडा असलेल्या पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायत धानिवरी अंतर्गत बांबू लागवडीचा शुभारंभ होणार आहे. बांबू लागवड झाल्यानंतर जाहीर कार्यक्रम कडुपाडा - नवापाडा या ठिकाणी पार पडणार आहे.

# वादळी पावसात आसवे शाळेचे नुकसान, ग्रामस्थांच्या एकजुटीने दुरुस्ती

**डहाणू, दि. ४ प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील आसवे पाटीलपाडा येथे २३ मे रोजी आलेल्या जोरदार वादळाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मोठे नुकसान केले. संध्याकाळच्या सुमारास आलेल्या या नैसर्गिक आपत्तीत शाळेच्या छतावरील पत्रे उडून गेले, पाण्याची टाकी कोसळली आणि महत्त्वाचे शैक्षणिक साहित्य पावसात भिजून खराब झाले. विशेषतः प्रोजेक्टरसारखी आधुनिक शिक्षणसाधनेही पाण्याच्या संपर्कात आल्याने नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी शाळेकडे धाव घेत मदतीचा हात दिला.

शिक्षक आणि ग्रामस्थांच्या मदतीने साहित्य सुरक्षित केले गेले. तातडीने प्लास्टिकच्या आडव्या



छताची व्यवस्था करण्यात आली. पाण्याच्या टाकीचा स्ट्रक्चर कोसळल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या संकटकाळात आसवे ग्रामपंचायतीचे सरपंचांनी पुढाकार घेत शाळेच्या दुरुस्तीसाठी मदतीचे आश्वासन दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी संयुक्तपणे शाळेच्या छतावर नव्या पत्र्यांची बसवणूक केली. परिणामी, शाळेची वर्गखोली पुन्हा वापरण्यायोग्य झाली असून विद्यार्थ्यांचे नियमित शिक्षण सुरू असणार आहे.

मात्र, पिण्याच्या पाण्याची समस्या अद्यापही कायम आहे. ग्रामस्थ आणि पालकांनी संबंधित शासकीय विभागाला तातडीने पाण्याच्या टाकीची पुनर्बांधणी करण्याची मागणी केली आहे. या आपत्तीच्या काळात ग्रामस्थांनी दाखवलेली एकजूट, तत्परता आणि ग्रामपंचायतीचे सक्रिय सहकार्य ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. अशा संकटांमध्ये एकत्र येणाऱ्या गावकऱ्यांची ही एकता ग्रामस्तरीय विकासासाठी आदर्श ठरावी अशीच अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**मनोर, दि. ४ प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबादमहामार्गावरील चिल्हार गावाच्या हद्दीतील नवजीवन हॉटेलसमोर गुजरात वाहिनी रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत पादचारी जागीच ठार झाला. सोमवारी रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास अपघात झाला होता. प्रदीप बडतरे (वय. 30, रा.दादडे, विक्रमगड) असे त्याचे नाव आहे.

महामार्गावर झालेल्या अपघाताची माहिती मिळताच मनोर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. पंचनामा करुन मृतदेह ताब्यात घेत मनोरच्या ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला होता. शवविच्छेदनानंतर शासकीय सोपस्कार पार पाडून मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

# गायिका लता भगतानी विष्णानी वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स आयकॉन २०२५ या पुरस्काराने सन्मानित

**उल्हासनगर, दि. ४ प्रतिनिधी**

उल्हासनगरच्या रहिवासी आणि जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या लता भगतानी विष्णानी या एक सिंधी गायिका आहेत. गेल्या ३५ वर्षांच्या अनुभवात त्यांनी अनेक प्रमुख सिंधी गायकांसोबत काम केले आहे. केवळ ८ व्या वर्षी त्यांनी गाणं सुरू केलं होतं. लता ह्या सिंधी लोकगीते, कलाम, शास्त्रीय संगीत यामध्ये पारंगत आहेत. त्यांचा विवाह उल्हासनगरचे प्रसिद्ध समाजसेवक सोनू विष्णानी यांच्याशी झाला असून, दोघंही मिळून "लता म्युझिकल ग्रुप" या नावाने कार्य करतात.

लता भगतानी यांचा आवाज स्वर्गीय कुमारिका भगवंती नवानी यांच्याशी खूप मिळताजुळता आहे. त्यामुळे त्या भगवंती नवानी यांचे शास्त्रीय आणि जुने गीत पुन्हा जिवंत करण्यास समर्थ ठरल्या आहेत. त्या त्यांच्या "सुखमनी" या गीत संग्रहासाठी विशेष प्रसिद्ध आहेत.

लता भगतानी विष्णानी यांना मिळालेला वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स आयकॉन २०२५ हा पुरस्कार सिंधीयत आणि आपल्या वारशाची शाश्वत भावना जपणाऱ्या क्षणासाठी अत्यंत गौरवाचा विषय आहे.

# 22 लाखांचा चरस जप्त

**भाईंदर , दि. ४ प्रतिनिधी**

अमली पदार्थ विरोधी कक्षाचे पथकाने मीरा रोड येथील सेवन इलेव्हन क्लब रस्त्यावर संशयास्पदरित्या फिरत असलेल्या एका इसमाला ताब्यात घेऊन झाडाझडती घेतली असता त्याच्याजवळ २२ लाख रुपये किंमतीचा २ किलो चरस हा अमली पदार्थ आढळून आला. मोहम्मद जब्बार शेख (२२, रा. नुरी चाळ, धारावी, मुंबई) असे त्याचे नाव आहे. याप्रकरणी मीरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून मोहम्मद शेखला अटक करण्यात आली आहे.


महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि. पालघर**

**-: ई-निविदा सुचना सन २०२५-२६:-**

**"मध्यवर्ती स्वयंपाकगृह विनवळ, ता. जव्हार, जि. पालघर व शासकीय आश्रमशाळा, विनवळ, ता. जव्हार, जि. पालघर येथे पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणे"**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि. पालघर अंतर्गत असणाऱ्या शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना नाष्टा व भोजन तयार करणेकामी मध्यवर्ती स्वयंपाकगृह, विनवळ, ता. जव्हार, जि. पालघर व शासकीय आश्रमशाळा, विनवल, ता. जव्हार, जि. पालघर येथे आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याचा टँकरने पुर्वठा करणे करीता ईच्छुक निविदाधारकांकडून दि. ०५.०६.२०२५ पासून ऑन लाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. पाण्याचा पुरवठा करणेबाबत्तव्या ई-निविदेचे सर्व अधिकारी प्रकल्प अधिकारी, जव्हार हे राखुन ठेवत आहेत.

निविदा विषयक सुचना, ई-निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी, सविस्तर वेळापत्रक, मुदतवाढ तसेच शुध्दीपत्रकाबाबत अधिक माहितीसाठी, httpps://mahatender.gov.in या संकेत स्थळाला भेट देण्यात यावी.

**सही/-**
**अपूर्वा बासुर (भा.प्र.से.)**
**प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,**
**जव्हार, जि. पालघर**

**डी.जी.आय.पी.आर. आरओसी-२०२५-२६/क्र-५/सी९९१**

महासागर



# शालेय गणवेशासाठी 4 कोटी 68 लाखांचा निधी

**पालघर, दि. ४ प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणानुसार समग्र शिक्षा अभियानांतर्गत ५० % व राज्य शासनाच्या गणवेश योजनेअंतर्गत ५० % असे एकूण शंभर टक्के निधीतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सन २०२५--२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये मोफत गणवेश वाटप केले जाणार आहे. यायोजने अंतर्गत जिल्हा परिषदेच्या मार्फत प्रत्येक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीकडे एकूण १,५६,१९१ विद्यार्थ्यांना गणवेशासाठी ४ कोटी ६८ लाख ५७ हजार ३०० रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

समग्र रिक्षा अभियानांतर्गत व राज्य सरकारच्या गणवेश योजनेअंतर्गत जिल्ह्यातील स्थानिक स्वराज संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या पहिली ते इयत्ता आठवीच्या वर्गातील सर्व मुली अनुसूचित जाती मुले अनुसूचित जमाती मुले तसेच दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील पालकांची मुले अशा एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांच्या करिता एक गणवेश संचाकरता तीनशे रुपये याप्रमाणे एक लाख ५६ हजार १९१ विद्यार्थ्यांना गणवेश तयार करण्याकरता पीएफएमएस प्रणाली द्वारे राज्य सरकारकडून जिल्ह्यातील शिक्षण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. हा निधी शिक्षण विभागाने शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग केला आहे.

मागील शैक्षणिक वर्षाच्या संपूर्ण कालावधीत शासनामार्फत देण्यात येणाऱ्या दोन गणवेशापैकी वर्षभरात केवळ एकच गणवेश विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकला.होता. ज्या एजन्सीला गणवेश पुरवण्याच्या ठेका देण्यात आला होता, त्यांनी तो पूर्ण केला नसल्यामुळे सरकारतर्फे थेट जिल्हा परिषद व जिल्हा परिषदेकडून थेट व्यवस्थापन समितीकडे गणवेशाच्या निधी देण्याच्या निर्णय यावर्षी घेतल्याने आता त्यातून विद्यार्थ्यांना दोन्ही गणवेश उपलब्ध होणार आहे. यासाठी व्यवस्थापन समितीकडे सदर निधी देखील वर्ग करण्यात आला आहे.

> समग्र शिक्षा अभियान व राज्य शासनाच्या शिक्षण धोरणानुसार पालघर जिल्ह्यामध्ये पहिली ते आठवीच्या १,५६,१९१ विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश तयार करण्यासाठी शाळांच्या व्यवस्थापन समितीकडे४,६८,५७,३०० रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे,
>
> **- सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, पालघर जिल्हा परिषद**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत डहाणू पालघर आणि वसई या तालुक्यात अधिक आहे. तर अनुसूचित जमाती मुलांची संख्या पालघर आणि वसई तालुक्यात अधिक आहे. तर अनुसूचित जातीच्या मुलांच्या संख्येत डहाणू, पालघर, तलासरी, विक्रमगड, वाडा या ठिकाणची संख्या अधिक आहे, तर दारिद्र्य रेषेखालील मुलांची संख्या डहाणू, वाडा, पालघरस वसई या तालुक्यात अन्य तालुक्यांच्या मानाने अधिक आहे.

शालेय गणवेशाच्या रंग प्रकाराबाबत संबंधित शाळेच्या व्यवस्थापन समितीने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यायच्या असला तरी राज्यामध्ये एक गणवेश योजना राबवण्यात यावी अशा सूचना देखील देण्यात आल्या आहेत. यामध्ये एक गणवेश स्काऊट गाईड आणि दुसरा गणवेश राज्यभरात समान असणार आहे.

# डहाणू आगारात नव्या एसटी बस दाखल



**डहाणू, दि. ४ प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या डहाणू आगारातील जुन्या आणि धोकादायक ठरलेल्या १६ बसमुळे प्रवाशांचे हाल सुरू होते. लांब पल्ल्याच्या मार्गांवर या जीर्ण बसमुळे वारंवार बिघाड, उशिर आणि अपघातांचा धोका वाढत होता. प्रवाशांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. अखेर या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत डहाणूचे आमदार विनोद निकोले यांनी विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात थेट २५ नव्या बस देण्याची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळून डहाणू आगारात पाच नव्या एसटी बस दाखल झाल्या असून, त्यांचे लोकार्पण जल्लोषात पार पडले.

या विशेष प्रसंगी आयोजित कार्यक्रमात आ. विनोद निकोले यांच्या हस्ते केक कापून नव्या बसचे औपचारिक स्वागत करण्यात आले. त्यानंतर आमदार निकोले यांनी प्रत्यक्षात बस चालवली. बस आगारातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी बस डेपोतील अडचणी जाणून घेतल्या. विशेषतः मानवी विकास योजनेअंतर्गत आलेल्या १४ बस डहाणू आणि तलासरी तालुक्यांत विभागल्या गेल्यामुळे अनेक दुर्गम गावांमध्ये वेळेवर बस पोहोचत नव्हती. नव्या बस उपलब्ध झाल्यामुळे दुर्गम व लांब पल्ल्याच्या मार्गांवर नियमित व वेळेवर सेवा सुरू होणार असून, प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्थानिक नागरिकांनी उर्वरित मागितलेल्या बस लवकरच आगारात दाखल व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या कार्यक्रमास माकपाचे तालुका सचिव रडका कलांगडा, किसान सभेचे कार्याध्यक्ष व ठाणे-पालघर अध्यक्ष चंद्रकांत घोरखना, कुशल राऊत, तन्मय बारी, वासु दुबळा आणि आगाराचे अधिकारी अजित अवतार, राजू पाटील, यंत्र कारागीर(मेकॅनिक) मनोज दुबळा, ड्रायव्हर - कंडक्टर व स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापालिका कंत्राटदारावर वीजचोरीचा गुन्हा

**वसई, दि. ४ प्रतिनिधी**

महावितरणाची वीज चोरी महापलिकेच्या करणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाईनंतर आचोळा पोलिस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल केला आहे. एप्रिलमध्ये कंत्राटदाराने नालासोपारा येथे जलवाहिन्यांचे काम करताना बेकायदा वीजजोडणी घेतली होती. या कंत्राटदारावर कारवाई करण्यासाठी आम आदमी पक्षाने पाठपुरावा केला होता. नालासोपाऱ्यातील संयुक्तनगरमधील झालावाड उद्यानाजवळ नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या होत्या. हे कंत्राट महापालिकेने इगल इन्फ्रा या कंपनीला देण्यात आले होते. एप्रिलमध्ये हे काम सुरू असताना पाण्याचा उपसा करण्यासाठी मोटरचा वापर करण्यात आला होता. यासाठी कंत्राटदाराने महावितरणच्या डीपी बॉक्समधून बेकायदा वीज चोरली होती. याप्रकरणी कंत्राटदारावर वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आम आदमी पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष जॉन परेरा यांनी केली होती. कारवाईसाठी महावितरणाकडे सतत पाठपुरावा केला होता. अखेर महावितरणने गुन्हा दाखल केला आहे.

# भिवंडी महापालिकेने केलेल्या जलकर व मललाभ करवाढीने नागरिकांत असंतोष

**भिवंडी दि. ४ प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिकेने नुकतेच जललाभ कर आणि मललाभ कर या दोन करामध्ये लक्षणीय वाढ केल्याने शहरातील करदाते नागरिक संतप्त झाले असून नियोजनात्मक नागरी सुविधा देण्यात अपयशी ठरलेल्या पालिकेने नियमित व वेळेत जल आणि मल सुविधा देण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी केली जात आहे. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात अनेक ठिकाणच्या नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा कायदेशीर दाबाने होत नाही. तळमजल्यावर देखील महानगरपालिकेचे पाणी मिळविण्यासाठी विजेची मशीन लावावी लागते. महानगरपालिका क्षेत्रात अनेक जुने-नवे गृहसंकुले असून त्यामध्ये गृहनिर्माण सोसायट्या स्थापन झाल्या आहेत. अशा सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या प्रत्येक सदनिका धारकाकडून मालमत्ता करासोबत जलकर घेतला जात आहे. गेल्या काही वर्षांपासून वेगळा जलकर आकारताना सोसायटीच्या जलवाहिनीच्या जलकर रद्द केलेला नाही. तसेच अनेक ठिकाणी नियमित व सरकारी वेळेनुसार पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. त्याचप्रमाणे ड्रेनेज बाबत वारंवार तक्रार करून देखील ड्रेनेज प्रवाह आणि चेम्बरची दुरुस्ती केली जात नाही. केंद्र आणि राज्य शासनाकडून मिळालेल्या निधी मधून शहरातील नागरिकांसाठी योजना नुसार काम झाल्याचे अधिकाऱ्यांनी जाहीर केले आहे. मात्र जल आणि मल वाहून नेण्याचे काम सुरु झालेले नाही. शहरातील नागरिकांना योग्य दाबाने पाणी मिळावे यासाठी पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. मात्र या टाक्यांमधून नागरिकांना पाणी वितरित केलेले नाही. तसेच मलनिःस्सारणासाठी भुयारी गटारांची योजना राबविली मात्र ही योजना अद्याप सुरु झालेली नाही. तत्कालीन अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी भिवंडी महानगरपालिका सुविधांची नागरिकांना केवळ स्वप्ने दाखविली. मात्र प्रत्यक्षात नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करदात्या नागरिकांना करावा लागत आहे. भिवंडी महानगरपालिकेचे माजी आयुक्त अजय वैद्य यांनी ११ फेब्रुवारी २०२५ रोजी घेतलेल्या ठराव क्र. ७४३ नुसार पाणीपुरवठा विभागाच्या सूचनेने सध्याच्या प्रशासनाने अलीकडेन जल लाभ कर (Water Benefit Tax) आणि मल लाभ कर (Sewerage Benefit Tax) २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून लागू केला आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांपासून कारयोग्य मूल्याच्या निवासी वापराकरिता १० टक्के व अनिवासी वापराकरिता १५ टक्के जल लाभ कर आकारण्यात आला आहे. तर सर्वप्रकारच्या मालमत्ताना सरसकट ८ टक्के मालमत्ता कर आकारण्यात येणार आहे. याबाबत शहरातील करदात्या मालमत्ता धारकांना हि दरवाढ माहिती होण्याच्या हेतूने महापालिकेतील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. याबाबत दवंडी देखील दिली नाही अथवा हरकती देखील मागविल्या नाही.सध्या महापालिकेत प्रशासन राज्य आहे. त्यामुळे अशी अचानक मनमानीपणे हि दरवाढ केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. महापालिकेत अनेक मालमत्ताधारक मालमत्ता कर भरत नाही. त्यामुळे हा वाढलेल्या कराचा भुर्दंड नियमित कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना सहन करावा लागणार आहे.

> भिवंडीत जल आणि मल प्रवाहासाठी विविध योजना राबविल्या आहेत. त्या कार्यान्वित होणार आहेत. त्या योजनेनुसार चालणाऱ्या कामकाजासाठी नियमित येणारा खर्च आणि या योजना अद्यावत ठेवण्यासाठी लागणारा खर्च मोठा असून त्यासाठी हि दरवाढ करणे अपेक्षित आहे.
>
> **- संदीप पटनावर, कार्यकारी अभियंता भिवंडी महानगरपालिका,**

# गोळीबारप्रकरणी प्रियकराला अटक

## मुलगी अल्पवयीन असल्याचेही उघड

**पालघर, दि. ३ प्रतिनिधी**

केळवे येथील एका हॉटेलमध्ये तरुणीवर झालेल्या गोळीबारप्रकरणी केळवे सागरी पोलिसांनी प्रियकराला अटक केली आहे. याप्रकरणात अद्याप स्पष्ट खुलासा होऊ शकलेला नाही. मात्र, प्रियकरानेच तिच्यावर गोळी झाडल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

केळवे येथील राखाडे भागातील न्याहरी निवास हॉटेलमध्ये अल्पवयीन मुलीसोबत प्रियकर दिनेश धोडीने रुम घेतली होती. त्यावेळी त्यानेच तिला पिस्तुल खोटे असल्याचे सांगत हाताळायला दिले होते. त्यावेळी प्रियकराकडून ट्रिगर दाबला गेल्याने पिस्तुलातील गोळी प्रेयसीच्या मानेत घुसून ती जबर जखमी झाली होती. बोईसर येथील लाईफलाइन रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली असून, तिची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

याघटनेनंतर पोलीस अधिक्षक, तपास अधिकाऱ्यासह इतरांकडून निरनिराळी माहिती सांगण्यात आली. प्रियकर बाथरूमला गेला असताना, तिला बागेमध्ये पिस्तूल दिसले. ते खोटे असावे असे वाटून ती ते न्याहाळीत असतानाच तिच्याकडून चुकीने ट्रिगर दाबला गेला व गोळी तिच्या मानेला लागली, असे सांगितले होते. मात्र, पत्रकारांनी याबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर पोलिसांनी आता प्रियकराची अधिक चौकशी केली असता, असता, गोळी प्रियकराकडूनच झाडली गेल्याचे सांगितले. यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत संशय व्यक्त होत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे जखमी तरुणीला ज्या रुग्णवाहिकेतून रुग्णालयात आणले, त्यातूनच तिच्या प्रियकरालाही पोलिसांनी रुग्णालयापर्यंत आणले होते. त्यामुळे त्या तरुणीवर त्याने दबाव टाकला असावा, म्हणून त्या तरुणीने आपल्या हातून चुकून पिस्तूल हाताळले गेल्याची माहिती दिली, असा आरोप केला जात आहे. मात्र, पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत शंका व्यक्त होऊ लागल्याने तपासाची चक्रे फिरली. प्रियकराची पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, त्याने आपल्या हातूनच पिस्तूल हाताळले गेल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# फेरीवाल्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याची मागणी

**भाईंदर, दि. ४ प्रतिनिधी**

मिरा भाईंदर शहरातील नयानगर परिसरातील फेरीवाल्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या मार्फत करण्यात आली आहे. मिरा रोड नयानगर परिसरात काही दिवसात फेरीवाल्यांकडून हल्ला करण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. मिरा रोड स्टेशन जवळ एकाची हत्या करण्यात आली होती. अश्या प्रकारे फेरीवाल्यांची वाढती दादागिरी मोडित काढण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या फेरीवाल्यांचा शोध घेईन त्यांचा बंदोबस्त करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वच फेरीवाल्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी

# पावसाळ्यापूर्वी नैसर्गिक नाले मोकळे करा - गणेश नाईक

**वसई, दि. ४ प्रतिनिधी**

मुंबई - अहमदाबाद महामार्गावरील पावसाळी पाणी वाहून नेणारे नैसर्गिक नाले माती भराव, कचरा, अतिक्रमण यामुळे बंद झाले आहेत. त्यामुळे पाणी वाहून जाण्यात अडचणी येत असल्याने पावसाळ्यापूर्वी पाणी वाहून नेणारे नैसर्गिक नाले मोकळे करा, असे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



मुंबई-अहमदाबाद महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी, पावसात साचणारे पाणी यामुळे वाहनचालक त्रस्त असल्याची दखल घेत पालकमंत्र्यांनी महामार्गाचा पाहणी दौरा केला. यावेळी त्यांनी महामार्गावर काम पूर्ण होण्याआधीच पडलेले खड्डे, वाहतूक कोंडी याबाबत तीव्र संताप व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांची कानउघडणी केली. यावेळी त्यांच्यासोबत खासदार हेमंत सवरा, आमदार राजन नाईक, जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, वसई विरार महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुंबई-अहमदाबाद महामार्ग देशातील प्रमुख महत्वाचा महामार्ग आहे. त्याची दुरवस्था विकसित पालघर जिल्ह्यासाठी योग्य नाही, असे खडसावत पालकमंत्री नाईक यांनी महामार्गावरील खड्डे, पाणी साचण्याची समस्या, वाहतूक कोंडी यासमस्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांची बैठक घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# पेरणीची घाई करू नका शेतकऱ्यांना हवामान विभागाचा सल्ला

**पालघर, दि. ४ प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात मॉन्सूनने प्रवेश केलेला नाही. १२ जूननंतर पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने त्यागोदर फळपिके भाजीपाला व इतर खरीप पिकांच्या शेतातील मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावीत व खरीप हंगामासाठी बियाणे, सेंद्रिय खते आणि रासायनिक खते उपलब्ध करून ठेवावी. कोरडवाहू जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांनी अद्याप भात पेरणीची घाई करू नये. कोरडवाहू जमिनीत खरीप पिकाच्या पेरणीसाठी एका आठवड्यात ७० ते १०० मिमी पाऊस पडणे आवश्यक असते. तेव्हाच जमिनीत बी रुजण्यायोग्य ओलावा निर्माण होतो. त्यामुळे ७० ते १०० मिमी पाऊस पडल्यानंतरच पेरणी करणे योग्य राहील, असा सल्ला कृषि विज्ञान केंद्र कोसबाडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विलास जाधव यांच्याकडून देण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाने प्रसारित केलेल्या विस्तारित श्रेणी हवामान अंदाजानुसार पालघर जिल्ह्यात पुढील एक आठवडा सरासरी पेक्षा कमी पाऊस पडणार असल्याचा अंदाज देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने प्रसारित केलेल्या विस्तारित श्रेणी हवामान अंदाजानुसार दिनांक ०५ ते १२ जून दरम्यान संपूर्ण जिल्ह्यात हलका पावसाचे संकेत असताना पावसाची आकडेवारी सरासरीपेक्षा कमी असेल, त्यानंतर आणि १३ ते १९ जून नंतर सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याबरोबरच पुढील दोन आठवडे किमान तापमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहील व कमाल तापमान ०५ ते १२ जून दरम्यान सरासरी पेक्षा कमी व १३ ते १९ जून दरम्यान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती कृषि विज्ञान केंद्र, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कोसबाड हिल येथील कृषि हवामान शास्त्रज्ञ् रिझवाना सय्यद यांनी दिली.

# व्हाळदेवी तलाव स्वच्छ करा- नगरसेवक संतोष शेट्टी

**भिवंडी दि.४ प्रतिनिधी**

भिवंडी शहराची तहान भागवणाऱ्या वऱ्हाळ देवी तलावात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून तलावात तवंग साचून दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे वऱ्हाळ देवी तलाव स्वच्छतेची मागणी महानगरपालिकेचे माजी नगरसेवक संतोष एम. शेट्टी यांनी महापालिका प्रशासक तथा आयुक्त आयुक्त अनमोल सागर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्यानुषंगाने भिवंडी महापालिका हद्दीतील कामतघर या ठिकाणी एकमेव वऱ्हाळ देवी तलाव आहे. सदर तलावातून २.० एमएलडी पाण्याचा पुरवठा भिवंडीकरांना दररोज होत आहे.परंतु सद्यस्थितीत सदर तलावात मोठ्या प्रमाणात



कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून तलावात हिरवा तवंग निर्माण झाला असून तलावातील पाण्याला कुचट आणि घाण वास येत आहे. त्यामुळे या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याने परिसरातील नागरिकांकडून दुर्गंधीनाशक - जंतुनाशक औषधांची फवारणी करण्याची मागणी होत आहे. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी मनपाच्या संबंधित विभागाला आदेश देवून वऱ्हाळ देवी तलावाच्या स्वच्छतेची मागणी संतोष शेट्टी यांनी केली आहे.

# प्रियंका सुरेश मोहिते यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण

**उल्हासनगर, दि. ४ प्रतिनिधी**

उल्हासनगरातील सुभाष टेकडी परिसरातील राहणारे कु. प्रियंका सुरेश मोहिते ही यूपीएससी २०२४ परीक्षेत उत्तीर्ण झाली असून तिची महाराष्ट्र कॅडर आय.पी.एस पदी निवड झाल्याबद्दल तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आय पी एस प्रियंका सुरेश मोहिते यांचा सुभाष टेकडीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात स्वराज्य संघटनेच्या वतीने अनेक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत गोविंद पानसरे लिखित "शिवाजी कोण होता"हे पुस्तक, शाल आणि पुषगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला आहे . आय पी एस प्रियंका सुरेश मोहिते यांनी सुभाष टेकडीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला अभिवादन करून संविधानाच्या रक्षणाचे कर्तव्य जबाबदारीने पार पाडणार असल्याचे सांगितले. तसेच स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. जय गायकवाड यांनी आय पी एस प्रियंका सुरेश मोहिते सारख्या तरुणी डॉ . बाबासाहेब आंबेडकर आणि सावित्रीमाईचे खरे अनुयायी आहेत.समाजातील तरुणांनी अशा पिढीचा आदर्श घेऊन शासनकर्ती जमात होण्यासाठी प्रयत्न करावे , असे आवाहान केले आहे . त्यावेळी सुभाष टेकडीतील उपस्थित नागरिकांनी आयपीएस प्रियंका मोहिते यांचे अभिनंदन करून कौतुक केले आहे .

# अनधिकृत बांधकाम प्रकरणी दोन मयतांसह ५ जणांवर एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल

**भिवंडी दि.४ प्रतिनिधी**

अनधिकृत बांधकाम प्रकरणी नोटीस बजावूनही सुनावणीला अनुपस्थितीत राहण्यासह मनपा सहाय्यक आयुक्तांनी आदेश देवूनही अनधिकृत बांधकाम निष्कासित न केल्याने पाच जणांच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिलाल अहमद अब्दुल अतीफ अन्सारी,मोहम्मंद कासिम मोह. अय्युब, मो.अन्वर मोह.अय्युब व २ मयत व्यक्ती यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,वरील पाच जणांना १ मार्च आणि १७ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या प्रभाग समिती क्र.१ चे बीट निरीक्षक मनोहर व नगररचना विभागाचे कनिष्ठ अभियंता अविनाश चव्हाण यांच्या अहवालानुसार वरील सर्वांना अनधिकृत बांधकामा संबंधित वेळोवेळी नोटीस बजावूनही ते सुनावणी साठी हजर राहिलेले नाहीत.तसेच त्यांच्याकडून लेखी खुलासा व कागद पत्रांची मागणी केली असता त्याचीही पूर्तता केलेली नाही.यासह प्रभाग समिती क्र.१ चे सहाय्यक आयुक्त मकसुम अहमद मुमताज अहमद शेख यांनी वरील सर्वांना अनधिकृत बांधकाम ७ दिवसांत हटवण्याचे निर्देश देवूनही सदर बांधकाम निष्कासित केलेले नाही. त्यामुळे याप्रकरणी २ जून रोजी मकसुम शेख यांच्या फिर्यादीवरून शांतीनगर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना १९६६ चे कलम ५२ प्रमाणे दोन मयतांसह पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# कंटेनरच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**भिवंडी दि.४ प्रतिनिधी**

ठाणे नाशिक वाहिनीने भिवंडीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनरने पादचाऱ्याला जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात पादचाऱ्याचा ट्रकखाली चिरडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली आहे.उमाशंकर महेश शर्मा (३२) असे अपघातात मयत झालेल्याचे नाव आहे.याप्रकरणी ट्रक चालकाच्या विरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,३ जून रोजी रात्री साडे अकरा वाजताच्या सुमारास उमाशंकर हा भिवंडी बायपास जवळील रिक्षा स्थानकावर उभा असताना कंटेनर क्र.जी.जे.१५ ए एक्स ३६२७ वरील चालकाने त्याच्या ताब्यातील कंटेनर भरधाव वेगात चालवून उमाशंकर यास जोरात धडक दिली.या धडकेत उमाशंकर खाली पडून कंटेनरचे चाक त्याच्या अंगावर गेल्याने त्याचा चिरडून जागीच तडफडून मृत्यू झाला आहे. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय स्व.इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवला आहे.तर अपघातानंतर कंटेनर चालक घटनास्थळावरून ट्रक सोडून फरार झाला असून त्याच्या विरोधात लवकुश सिताराम शर्मा (३८) याच्या फिर्यादीवरून कोनगाव पोलिसांत भान्यासं कलम १०६(१), २८१ सह मो.वा.का. कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पोलिस चालकाचा शोध घेत आहेत. पुढील तपास सपोनि वैभव मुबळे करीत आहेत.

# एसटी बस ट्रकची समोरासमोर धडक

**मनोर, दि. ४ प्रतिनिधी**

पालघर आगाराची बस नागझरी जात असताना अति वेगात असलेल्या एसटी चालकाने समोरून येत असलेल्या हायवा ट्रकला जोरदार धडक दिल्याने अपघात झाला होता. अपघातात दोन्ही चालकांना गंभीर दुखापत झाली असून एसटी आणि हायवा वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पालघर आगाराची बस घेऊन चालक आदिनाथ खेडकर पालघर नागझरी फेरीसाठी पहाटे साडे पाच वाजण्याच्या सुमारास पालघरवरून नागझरीच्या दिशेने निघाले होते. सकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास मासवण नागझरी रस्त्यावरील वांदीवली गावाच्या हद्दीत पोचली असता समोरून ट्रक येत असल्यामुळे बस चालकाने वेग कमी करण्यासाठी ब्रेक दाबले असता पावसामुळे निसरड्या झालेल्या रस्त्यावर बस घसरून समोरून येणाऱ्या हायवा ट्रकला बसने जोरदार धडक दिली. अपघातात बस चालक आणि हायवा चालक जखमी झाले आहेत.दोन्ही चालकांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नुकताच केलेल्या रस्त्याच्या नूतनीकरणाच्या कामामुळे गुळगुळीत झालेल्या मासवण नागझरी रस्त्यावर वाहनांचा वेग वाढला आहे. अपघातग्रस्त मासवण नागझरी एसटी बसचा चालक बस वेगात चालवत असल्यामुळे अपघात झाल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. तसेच बस चालकाविरोधात कारवाईची मागणी केली आहे.

# पतीच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**भिवंडी दि.४ प्रतिनिधी**

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पती विवाहितेला त्रास देत असल्याने पतीच्या जाचाला कंटाळून विवाहितेने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल्हेर गावात मंगळवारी घडली आहे. याप्रकरणी सासूच्या फिर्यादीवरून जावयाच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुर्गा धिरज चौहाण (२२) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे.तर धिरज जेटुलाल चौहाण (२३, मूळ रा.राजस्थान) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,मयत दुर्गाचे धिरज याच्याशी काही महिन्यांपूर्वी लग्न झाले असून ते काल्हेर येथील दुर्गेश पार्क जवळील साई अपार्टमेंट मधील सदनिका क्र.३०३ मध्ये राहत आहेत. दरम्यान लग्नानंतर धिरज हा दुर्गाच्या चारित्र्यावर संशय घेत होता.तसेच या संशयावरून तिला त्रासही देत असल्याचे दुर्गाची आई श्रेनु अत्तर शेख (४५) यांनी त्यांच्या फिर्यादीत म्हटले असून पतीच्या सततच्या जाचाला कंटाळून ३ जून रोजी दुर्गाने सासरी राहत्या घरी ओढणीच्या सहाय्याने सिलिंग फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सांगितले आहे. त्यामुळे याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्यात धिरजच्या विरोधात भान्यासं कलम १०८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.या घटनेचा पुढील तपास मपोउनि सायली शिंदे करीत आहेत.

# पूर्व वैमनस्यावरून सफाई कामगारावर प्राणघातक हल्ला

**उल्हासनगर, दि. ४ प्रतिनिधी**

उल्हासनगरच्या भैय्यासाहेब आंबेडकर नगरात पूर्व वैमनस्या वरून एका सफाई कामगारावर चार ते पाच जणांच्या टोळीने प्राणघातक हल्ला केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. काल दुपारच्या सुमारास ही घटना घडली असून या हल्ल्यात अक्षरशः पायाचे दोन तुकडे झाले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असुन पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.

पवन श्यामबाबू ढकोलिया असे गंभीर जखमी झालेल्या सफाई कामगाराचं नाव आहे. पवन हा भैय्यासाहेब आंबेडकर नगर येथील रहिवासी असून तो सफाईकामगार आहे. काल दुपारी पवन हा कामावरून घरी जात असताना चार ते पाच जणांच्या टोळीने भैय्यासाहेब आंबेडकर नगर या ठिकाणी रस्त्यात अडवून त्याच्या वर प्राणघातक हल्ला केला आहे. या हल्ल्यात पवन च्या पायाचे दोन तुकडे झाले असुन डोक्यात दगड टाकल्याने १५ पेक्षा अधिक टाके पडले आहेत. यापूर्वी पवन याला धमकी देण्यात आली होती. या नंतर हा हल्ला झाल्याचे त्याच्या नातेवाईकांनी सांगितले आहे. आता याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहे.

